Add



**गोवा मुक्ती संग्रामात सहभागी झालेले स्वातंत्र्य सैनिक. श्रीमती कमलताई भागवत, स्वातंत्र्य सैनिक यांची शिफारस ग्राहय धरणेबाबत निर्गमित केलेले आदेश रद्द करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक पीओएस -१०९७/प्र.क्र.८७/९७/स्वासैक-१,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २०००.

वाचा : १. शासन निर्णय, क्रमांक पीओएस -१२८६(३)स्वासैक, दि. ७ ऑगस्ट १९८६,
२. शासन निर्णय, क्रमांक पीओएस -१०९३ /प्र.क्र.१२७/स्वासैक, दि. ४ जुलै १९९५,
३. शासन निर्णय, क्रमांक पीओएस -१०९७/प्र.क्र.८७/९७/स्वासैक-१, दि. १८.८.९९

शासन निर्णय : गोवा मुक्ती संग्रामामध्ये भाग घेतलेल्या व महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या ज्या स्वातंत्र्य सैनिकांना शिक्षा झाली किंवा तुरुंगवास भोगावा लागला किंवा ज्यांना जखमा झाल्या व उपचारासाठी इस्पितळात दाखल व्हावे लागले अशा स्वातंत्र्य सैनिकांनी योग्य ते पुरावे शासनाकडे सादर केल्यास इतर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे पेन्शन व इतर आर्थिक सवलती देण्याचा निर्णय शासनाने क्रमांक पीओएस -१२८३(३)स्वासैक, दिनांक २२ जानेवारी १९८६ च्या शासन निर्णयान्वये घेतला परंतु यानंतर शासनाच्या असे निदर्शनास आले की, यासंबंधात रेकॉर्ड उपलब्ध होत नाही त्यामुळे शासन निर्णय क्रमांक पीओएस -१२८६(३)स्वासैक, दि. ७.८.१९८६, अन्वये यासंबंधात सुधारित निकष निर्गमित करण्यात आले. या शासन निर्णयात गोवा स्वातंत्र्य सैनिकासाठी पेन्शन मंजूर करण्याबाबत लागू करण्यात आलेल्या निकषांचा सविस्तर ऊहापोह केलेला आहे. त्याशिवाय स्वातंत्र्य सैनिकांनी त्यांच्या अर्जासोबत निश्चित कोणते पुरावे सादर करावेत याबाबतचे सुधारित निकष शासनाच्या दि. ४ जुलै, १९९५ च्या शासन निर्णयात दिलेले आहेत.

गोवा सत्याग्रहात काम केलेल्या नामवंत, व्यक्तिपैकी श्रीमती कमलताई भागवत यांनी गोवा सत्याग्रहात संघटनात्मक काम केल्यामुळे व त्यांना गोवा सत्याग्रहाबाबत संपूर्ण व सविस्तर माहिती असल्यामुळे शासनाने याबाबत सांगोपांग विचार करुन गोवा स्वातंत्र्य सैनिकांच्या अर्जासोबत जर एखाद्या अर्जदाराने श्रीमती कमलताई भागवत यांचे शिफारस पत्र जोडले असेल तर गुणवत्तेवर ते ग्राहय धरण्याचा निर्णय शासन निर्णय क्र. पीओएस -१०९७/प्र.क्र.८७/९७/स्वासैक-१, दि. १८.८.९९ रोजी घेतला होता. श्रीमती कमलताई भागवत यांनी शासनास पत्राने कळविले आहे की आता त्यांचे वय झाले आहे. शासनाने त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी त्या पार

पाडू शकत नाहीत. शिवाय केवळ आठवणीवर कोणासही शिफारस पत्र देऊ इच्छित नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

श्रीमती कमलताई भागवत यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेली असमर्थता विचारात घेऊन शासनाने या प्रस्तावी असा निर्णय घेतला आहे की, यापूर्वी श्रीमती कमलताई भागवत यांनी गोवा मुक्ती संग्रामात सहभागी झालेल्या ज्या स्वातंत्र्य सैनिकांना शिफारशी दिल्या आहेत त्या ग्राह्य धरण्यास हरकत नसावी. तथापि, यापुढे मात्र श्रीमती कमलताई भागवत यांनी शिफारस केलेले अर्ज ग्राह्य धरु नयेत. तसेच गोवा मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या अर्जासोबत ज्या नामवंत व्यक्तींची केलेल्या शिफारशी स्विकारण्याचे शासनाने मान्य केले आहे, त्यापैकी कै. प्री.के. सावंत आणि कै. भगवंतराव गायकवाड यांचीही नावे यापुढे वगळण्यात यावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
अध्यक्ष/सभापती/सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मुंबई,
मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व प्रधान सचिव/विशेष सचिव/ सचिव यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभाग (का.२५), मंत्रालय, मुंबई,
वित्त विभाग (व्यय-१),मंत्रालय, मुंबई,
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
संचालक लेखा व कोषागारे, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान लेखाधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (प्रसिध्दी पत्रक काढण्यासाठी),
अवर सचिव, भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्ली (पत्राने),